दलित साहित्य : एक चिंतन
**(Dalit Sahitya : Ek Chintan)**

©प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे
बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी
ता.जि. अहमदनगर

संपादक
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. अशोक डोळस

प्रकाशक
श्रीमती लता सदाशिव सरकटे

POWER OF KNOWLEDGE
ISSN 2320 - 4494 UGC APPROVAL NO - 45681
RNI NO. MAHAUL03008/13/1//2012-TC
विशेषांक : जानेवारी २०१८

टाईपसेटींग–लेआऊट
कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर ९८५०२३२८९०

मुद्रक
मळगंगा ऑफसेट, अहमदनगर

मूल्य :- ४००/-



Scanned by CamScanner

१५) दलित साहित्याची पूर्वपीठिका :
संत चोखामेळा व त्यांचा परिवार / १३५
– प्रा.डॉ. संदीप तापकीर
१६) साठोत्तरी साहित्य प्रवाह : नियतकालिकांचे योगदान / १४०
– प्रा. अरविंद भराडे
१७) दलित साहित्याचा साठोत्तर साहित्य प्रवाहावरील प्रभाव / १४४
– प्रा.डॉ. रामचंद्र झाडे
१८) दलित साहित्य आणि आंबेडकरी चळवळ / १४७
– रमेश कचरे
१९) दलित साहित्य आणि आंबेडकरी चळवळ / १५२
– प्रा. स्वाती निकम
२०) दलित कवितेचे बदलते परिमाण : खोपा आणि झेंडा / १५७
–प्रा.डॉ. ललित अधाने
२१) दलित साहित्य आणि संत साहित्य / १६८
– प्रा.डॉ. सी. एस. आवारे
२२) दलित साहित्याची वैश्विकता / १७४
– प्रा.डॉ. एन. डी. चौधरी
२३) दलित कविता आणि जलजाणिवा / १७७
– प्रा.डॉ. उज्ज्वला भोर
२४) मराठवाड्याची दलित कविता / १८६
– प्रा.डॉ. संतोष देशमुख
२५) समकालिन दलित काव्यातील स्त्री वेदना / १९१
– प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे
२६) दलित साहित्य : स्थिती आणि दिशा / १९५
– प्रा.डॉ. मनोहर सिरसाट
२७) मराठी दलित कवितेची वाटचाल / १९९
– प्रा. बाळासाहेब कटारे
२८) दलित साहित्य व संतसाहित्य : एक अनुबंध / २०७
– प्रा. अनिता भद्रे
२९) दलित साहित्य आणि संतसाहित्य / २१४
– प्रा. मंगला पाटील



Scanned by CamScanner

# दलित साहित्य : स्थिती आणि दिशा

– प्रा. डॉ. मनोहर सिरसाट
सहा. प्राध्यापक तथा संशोधन मार्गदर्शक
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
धारूर, जि. बीड मो.नं. ९४२२६५२९३४

दलित साहित्य प्रवाह हा राष्ट्रपिता ज्योतीराव फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरक अशा विचारांच्या प्रेरणेतून जन्मास आलेला प्रवाह आहे. मुळात हा प्रवाह चळवळ म्हणूनच पुढे आला. समाजाचे वास्तव भान आणि उपेक्षितांचा आवाज या प्रवाहाने प्रवाहित केल्यामुळेच या साहित्य प्रवाहाला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. या दलित साहित्याच्या प्रवाहाने मराठी साहित्य परंपरेला आणि साहित्याच्या इतिहासालाच नवे वळण दिले, नवा आशय दिला, नवे आविष्करण दिले. आत्तापर्यंतच्या साहित्याला असणाऱ्या आशयाच्या मर्यादेला दलित साहित्य प्रवाहाने अधिक व्यापकता दिली. मराठी साहित्यसृष्टीचे आशयाचे अवकाश या साहित्य प्रवाहाने अधिक विस्तृत केले. नवा जीवनानुभव मराठी साहित्यात या निमित्ताने अवतीर्ण होऊन अवघ्या मराठी साहित्यसृष्टीला एकप्रकारे हादरे देण्याचे काम केले. नवी भाषा, नवा अनुभव, नवी शैली यामुळे दलित साहित्य प्रवाहाने अधिक स्पष्टपणे आपले अस्तित्व सिद्ध केले. एक वेगळी ओळख मराठी साहित्य सृष्टीत निर्माण झाली. लोकशाहीमूल्यांची जोपासना करीत एकूण मानवी कल्याणाचा विचार करणारा आणि मानवतावादाची आग्रही भूमिका घेणारा हा साहित्यप्रवाह प्रचंड प्रतिभा घेऊन सकस अशा आशयासह आविष्कृत झाला.

शोषणाधिष्ठित विषम व्यवस्था बदलवून समताधिष्ठित समाजनिर्मितीचा विचार दलित साहित्य प्रवाहाने अधिक प्रबळ करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारातून केले. आपल्या जगण्यातील वेदना शब्दबद्ध करून प्रस्थापित अशा शोषण करणाऱ्या यंत्रणांविषयी विद्रोहाची भूमिका घेत या सर्व गोष्टींना नाकारण्याचा एक दृष्टिकोन घेऊन या साहित्यप्रवाहाने आपला जीवनानुभव आविष्कृत



Scanned by CamScanner